**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा/२०१२/प्र.क्र.१२/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २८/०१/२०१२

वाचा: १) राज्य निवडणूक आयोगाचे क्र.एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९ /का.१०, दि.३१/३/२००९ चे पत्र व त्यासोबतची सहपत्र.
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/जीईएन/२००२/ सी.आर.८५ /का.५, दि. १३/३/२००४ चे (मराठी व इंग्रजी) आदेश व त्यासोबतची सहपत्र.
३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/जीईएन/२००२ सी.आर.८५ /का.५, दि. ७/७/२००८ चे (मराठी) आदेश.

## परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ३१/३/२००९ च्या पत्रासोबत स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत अपत्यांसंदर्भात द्यावयाचे शपथपत्र / घोषणापत्राचा मराठी व इंग्रजी भाषेतील नमुना विहित केलेला आहे.

आयोगाच्या दि. १५/३/२००४ च्या आदेशासोबत स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी तसेच स्थावर व जंगम मालमत्तेचा तपशील देणारे शपथपत्र / घोषणापत्राचा मराठी व इंग्रजी भाषेतील नमुना विहित केलेला आहे. तसेच आयोगाच्या दि.७/७/२००८ च्या आदेशान्वये यासंदर्भातील शपथपत्र / घोषणापत्राच्या मराठी भाषेतील नमुन्यामध्ये सुधारणा केलेली आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाने शपथपत्र / घोषणापत्राचे नमुने मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये दिलेले असल्यामुळे निवडणूक लढविणारे उमेदवार यापैकी कोणत्याही भाषेमध्ये शपथपत्र / घोषणापत्र सादर करु शकतात. तथापि, राज्य निवडणूक आयोगाकडे अशा तक्रारी आल्या आहेत की, उमेदवारांनी शपथपत्र / घोषणापत्र मराठी भाषेतच भरले पाहिजे यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून आग्रह धरला जातो. तरी यासंदर्भात

स्पष्ट करण्यात येते की, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना मराठी अथवा इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेतून विहित नमुन्यात शपथपत्र / घोषणापत्र सादर करण्याची मुभा देण्यात यावी.

सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे सूचना देण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति
सर्व जिल्हाधिकारी. (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त.